# * निवडणूक आयोग *

कलम : ३२४ - अनुसार निवडणूक आयोगाला संसद, राज्यविधिमंडळे, भारताच्या राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणूकीवर देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रणाचे अधिकार.

- केंद्र व राज्यांसाठी एकच - म्हणून आखिल भारतीय संस्था.

कलम ३२४ मधील तरतुदी :

① आयोगात एक मुख्य निवडणूक आयुक्त आणि राष्ट्रपती वेळोवेळी ठरवील इतके इतर निवडणूक आयुक्त असतील.

② त्यांची नियुक्ती राष्ट्रपतीकडून.

③ आयोगाच्या सल्ल्यासाठी आवश्यकता वाटल्यास राष्ट्रपती विभागीय आयुक्त नियुक्त करेल.

④ वरील सर्वांच्या सेवाशर्ती आणि कार्यकाळ राष्ट्रपती ठरवील.

सन १९५० मध्ये स्थापना झाल्यापासून १५ ऑक्टो १९८९ पर्यंत — एकसदस्यीय संस्था.

१६ ऑक्टो १९८९ - नंतर आणखी दोन आयुक्तांची नियुक्ती

कारण मतदारांचे वय २१ वरून १८ वर्षे झाल्याने कामाचा व्याप वाढला.

जाने १९९० - पुन्हा ही दोन पदे रद्द.

ऑक्टो १९९३ — पुन्हा नियुक्ती. - राष्ट्रपती कडून

मुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्त यांना समान अधिकार, समान वेतन व भत्ते. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याया. दर्जा.

⇒ तिघांमध्ये मतभेद झाले तर निर्णय बहुमताने.

→ कार्यकाळ ६ वर्षे किंवा वयाची ६५ वर्षे जो अगोदर होईल तो.

कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी राष्ट्रपतीकडे राजीनामा देवू शकतात. किंवा काढून टाकले जावू शकते.

स्वातंत्र्य : ① कार्यकालाची हमी. - सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला ज्या पद्धतीने पदच्युत करतात मुख्य नि. आयुक्त. त्याच पद्धतीने पदच्युती.

② इतर किंवा विभागीय निवडणूक आयुक्ताला मुख्य निवडणूक आयुक्ताच्या शिफारशीशिवाय पदावरून कमी करता येत नाही.

त्रुटी. ① पात्रता निकष सांगितलेले नाहीत. (कायदेशीर शैक्ष., प्रशा, न्यायिक)

② आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाळ सांगितलेला नाही.

③ निवृत्त होणाऱ्या आयुक्ताची शासनाने अन्य पदावर नियुक्ती करण्यावर बंदी नाही.

Scanned by CamScanner

## अधिकार व कार्ये :

कार्ये 3 प्रकारची – ① प्रशासकीय ② सल्लागारी ③ अर्ध-न्यायीक.

① परिसीमन आयोग कायद्याच्या आधारे मतदारसंघाचे भौगोलिक क्षेत्र ठरविणे.
② मतदार याद्या, मतदार नोंदणी इ.
③ निवडणूक प्रक्रिया
④ राजकीय पक्षांना मान्यता चिन्ह.
⑤ मान्यता व चिन्ह संदर्भातील वाद सोडविण्यासाठी न्यायालयाप्रमाणे काम.
⑥ आचारसंहिता.
⑦ निवडणूक काळात रेडिओ/दूरदर्शनवरुन राजकीय पक्षांनी धोरणे प्रसिद्ध करण्याचा अनुक्रम.
⑧ संसद सदस्य - अपात्रतेसंदर्भात - राष्ट्रपतीला सल्ला.
⑨ विधिमंडळ सदस्यांच्या –॥– राज्यपाल सल्ला.
⑩ निवडणुकीत नियमबाह्य घटना घडल्यास निवडणूक रद्द करणे.
⑪ निवडणूक यंत्रणेवर देखरेख.
⑫ राज्यातील आणीबाणीच्या काळात निवडणूक घेण्यासंबंधी राष्ट्रपतीला सल्ला.
⑬ राजकीय पक्षाची नोंदणी - राष्ट्रीय किंवा राज्य पक्षाचा दर्जा.

## निवडणूक उपायुक्त

निवडणूक आयुक्तांना सहाय्य करतात. ते नागरी सेवेतील असतात व आयुक्त त्यांना ठराविक कालावधीसाठी नियुक्त करतो.

* राज्य स्तरावर राज्य सरकारशी विचार विनिमय करुन मुख्य निवडणूक आयुक्ताने नेमणूक केलेला मुख्य निवडणूक अधिकारी निवडणूक आयोगाला सहाय्य करतो.

* जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी निवडणूक अधिकारी.

सुनिल अरोरा - मुख्य निवडणूक आयुक्त. – A-WEB

अशोक लवासा }
सुशिल चंद्रा } सहायक –॥–

# संघ लोकसेवा आयोग

⇒ सेवक भरती करणारी मध्यवर्ती संस्था ⇒ घटनात्मक संस्था ⇒ भाग 14 — कलम 315 ते 323

## संरचना :

⇒ भारताच्या राष्ट्रपतीने नियुक्त केलेले अध्यक्ष व इतर सदस्य.
⇒ घटनेत सदस्यसंख्या सांगितली नाही. ⟶ राष्ट्रपतीच्या विवेकाधिकारावर
⇒ संरचना राष्ट्रपती ठरवतो.
⇒ अध्यक्षासह 9 ते 11 सदस्य ⟶ निम्मे सदस्य केंद्र किंवा राज्य सरकारांच्या सेवेत किमान 10 वर्षे
⟶ निम्मे सदस्य- पात्रता निकष सांगितले नाही.
⇒ सेवाशर्ती ठरवितो - राष्ट्रपती.

## कार्यकाल :

अध्यक्ष व सदस्य - 6 वर्षे / 65 वर्षे वय यापैकी जे अगोदर पूर्ण होईल.
त्यापूर्वी राष्ट्रपतीकडे राजीनामा देऊ शकतो.
राष्ट्रपती पदच्युत करू शकतो.

## पदच्युती :

राष्ट्रपती अध्यक्ष किंवा सदस्याला पदच्युत करू शकतो जर
① तो नादार / दिवाळखोर ठरविला गेला
② पैशासाठी इतरत्र नोकरी स्वीकारली.
③ शारी / मानसिक दृष्ट्या अक्षम बनला.

याशिवाय गैरवर्तनाच्या कारणावरून - अर्थात संबंधित सदस्याची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला कळवतात दोषी आढळला तर पदच्युत करू शकतात. या संदर्भात न्याया. चा सल्ला बंधनकारक.
→ सर्वोच्च न्याया. चौकशीच्या काळात तो अध्यक्षाला / सदस्याला निलंबित करू शकतो.

## हंगामी अध्यक्ष

① जेव्हा अध्यक्षपद रिक्त होते.
② काही कारणामुळे काम करण्यास अक्षम असतो.

नियुक्त केलेला अध्यक्ष कार्यभार पूर्ण होईपर्यंत किंवा पुढील अध्यक्ष पदावर येईपर्यंत हंगामी अध्यक्ष राहतो.

## स्वातंत्र्य

— ① कार्यकालाची हमी.
② अध्यक्ष व सदस्यांचे वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन भारताच्या संचित निधीतून
③ पद सोडल्यानंतर अध्यक्ष भारत सरकार किंवा राज्यसरकारमध्ये पुनर्नियुक्तीसाठी पात्र नसतो.
④ पद — " — सदस्य ———— " ————
परंतु संघ लोकसेवा आयोगाच्या / राज्य लोकसेवा अध्यक्ष पदासाठी पात्र असतो.

** अध्यक्ष ए.आर. किडवाई यांची बिहारच्या राज्यपाल पदी केलेली नियुक्ती 1980 मध्ये सर्वोच्च न्याया. वैध कारण राज्यपाल घटनात्मक पद - सरकारी सेवेतील नाही.

Scanned by CamScanner

⑤ पहिले कार्यकाळ संपल्यावर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष किंवा सदस्य पुनर्नियुक्तीसाठी ( दुसऱ्या कार्यकालासाठी ) पात्र नसतो.

कार्ये :

① अखिल भारतीय सेवा, संघ सेवा, किंवा संघशासित प्रदेशांच्या सेवा - नियुक्तीसाठी परीक्षा घेणे
② दोन किंवा अधिक राज्यांनी विनंती केल्यास संयुक्त भरतीची योजना आखणे.
③ कार्मिक व्यवस्थापनासंबंधी खालील मुद्द्यावर आयोगाशी विचारविनिमय.

- नागरी सेवांच्या भरती प्रणाली संदर्भात.
- या सेवांमधील नियुक्ती, पदोन्नती, बदली संदर्भातील नियम.
- नागरी पदावर काम करणाऱ्या व्यक्तींबाबत शिस्तभंगाची कारवाई.

यामध्ये → • ठपका (तीव्र नापसंती) • खालच्या पदावर टाकणे (पदावनती)
• वार्षिक वाढ रोखणे • सक्तीची निवृत्ती
• पदोन्नती रोखणे • सेवेतून हटविणे
• आर्थिक नुकसान भरपाई. • सेवेतून काढून टाकणे.

• सेवेतून हटविल्याने भविष्यात सरकारी सेवेसाठी अपात्र ठरत नाही. काढून टाकल्याने अपात्र ठरतो.

* उपरोक्त विचारविनिमयाची तरतूद अनिवार्य नसून मार्गदर्शनात्मक आहे. म्हणजेच वरील विषयासंदर्भात सरकारने आयोगाशी विचारविनिमय केला नाही म्हणून पिडीत सेवक न्यायालयात जाऊ शकत नाही.

④ केंद्रीय सेवांसंदर्भात इतर अतिरिक्त कार्ये संसद संघ लोकसेवा आयोगाकडे सोपवू शकते. आपल्या अधिकार क्षेत्रातील कोणत्याही प्राधिकरणाची, कंपनीची किंवा सार्व. संस्थेची कार्मिक प्रणाली संसद आयोगाकडे सोपवू शकते.

⟹ आयोग आपल्या कामाचा अहवाल राष्ट्रपतींना सादर करतो. राष्ट्रपती अहवाल दोन्ही गृहाकडे मांडतो जेथे आयोगाचा सल्ला स्विकारण्यात आला नाही त्याचे सकारण स्पष्टीकरण मांडतो अशा अस्वीकृत बाबी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने मान्य केल्या पाहिजेत. एखाद्या मंत्रालयाला किंवा विभागाला आयोगाचा सल्ला नाकारण्याचा अधिकार नाही.

⟹ खालील बाबीवर आयोगाशी विचारविनिमय केला जात नाही.

① मागासवर्गासाठी नियुक्त्या व पदांमध्ये आरक्षण.
② SC/ST जमातींच्या मागण्या
③ आयोग व न्यायाधिकरण यांचे अध्यक्ष व सदस्य निवड, उच्च राजनैतिक स्वरूपाच्या पदावर निवड आणि ग्रुप व व ड सेवांतील निवडी.
④ तात्पुरत्या कालावधीच्या नेमणुकीसंदर्भात ( 1 वर्षापेक्षा कमी)

**भूमिका** ⇒ ① संघ लोकसेवा आयोग भारतातील गुणवत्ता पद्धतीचा संरक्षणकर्ता असावा असे राज्यघटनेला अपेक्षित.

② आयोग आयोग भारतीय सेवा, संघ लोकसेवा वर्ग अ व ब च्या भरतीशी संबंधित.

③ मागितला जाईल तेव्हा पदोन्नती किंवा शिस्तभंगाच्या कारवाईबाबत सल्ला.

④ सेवांचे वर्गीकरण, वेतन व सेवाशर्ती, संवर्ग व्यवस्थापन, प्रशिक्षण यांच्याशी आयोगाचा संबंध नाही. ⟹ या बाबी कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयातील कार्मिक व प्रशिक्षण विभाग हाताळतो.

⑤ आयोगाच्या कामाशी सहयोगी स्वरूपाच्या –

* सन १९६४ - केंद्रिय दक्षता आयोग – स्थापना – नागरी सेवकांविरुद्ध कारवाई करताना लोकसेवा आयोगाबरोबर दक्षता आयोगाचा सल्ला – दोघांत विरोधाभास असल्यास – दक्षता आयोग प्रमाण.

संघ लोकसेवा आयोगाशी संबंधित कलमे : (तसेच राज्य लोकसेवा आयोगाशी)

३१५ – केंद्र व राज्यांसाठी लोकसेवा आयोग.
३१६ – सदस्यांची नियुक्ती
३१७ – सदस्याला हटविणे व निलंबित करणे.
३२० – लोकसेवा आयोगाची कार्ये.

## ✱ राज्य लोकसेवा आयोग ✱

भाग १४ ⇒ कलम ३१५ ते ३२३ :

**संरचना** ⇒ राज्यपालाने नियुक्त केलेले अध्यक्ष व सदस्य.
घटनेत सदस्यसंख्या नमूद नाही. – राज्यपालांच्या विवेकाधिकारावर.
निम्मे सदस्य केंद्र किंवा राज्य सरकारच्या सेवेत १० वर्षे काम केलेले असावेत.
अध्यक्ष व सदस्यांच्या सेवाशर्ती ठरविण्याचे अधिकार - घटनेने - राज्यपालाला.

**कार्यकाल** ⇒ ६ वर्षे (वयाची ६२ वर्षे जो कालावधी अगोदर पूर्ण होईल) (४१वी घ.दु. १९७६ ने वय मर्यादा ६० वरून ६२ वर)

**हंगामी अध्यक्ष** – नियुक्ती - राज्यपालाकडून. – (१५वी घ.दु. १९६३)
इतर बाबी संघ लोकसेवा आयोगाप्रमाणे.

**पदच्युती** : राष्ट्रपती मार्फत – संघ लोकसेवा - तरतुदीप्रमाणे त्याच कारणासाठी व त्याच पद्धतीने –
① दिवाळखोर ② नोकरी स्वीकारली ③ अक्षम बनला.
गैरवर्तनाच्या कारणावरून – सर्वोच्च न्यायालयाकडे चौकशी करण्यास सांगणार दोषी आढळल्यास पदच्युत

स्वातंत्र्य → संघ लोकसेवा आयोगाप्रमाणे.
① कार्यकालाची हमी.
② वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन राज्याच्या संचित निधीतून.
③ भारत सरकार / राज्य सरकार इतर सेवेस अपात्र
सदस्य → (राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष, संघ लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष किंवा सदस्य किंवा इतर राज्याच्या आयोगाच्या अध्यक्ष पदी → पात्र)
अध्यक्ष → (संघ लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष / सदस्य / इतर राज्य - अध्यक्ष)
④ पहिले कार्यकाळ संपल्यावर अध्यक्ष / सदस्य पुनर्नियुक्तीसाठी पात्र नसतो.

आधिकार व कार्ये

केंद्रिय लोकसेवा आयोग केंद्रिय सेवांच्या बाबतीत जी कार्ये करते तिच कार्ये राज्य लोकसेवा आयोग राज्याच्या सेवांच्या बाबतीत -
→ कार्मिक व्यवस्थापनाच्या नीति सल्ले राज्य सरकारवर बंधनकारक नसतो.
→ अहवाल राज्यपालांकडे - तो दोन्ही गृहासमोर मांडतो / एक गृहासमोर

मर्यादा → केंद्रिय लोकसेवा आयोगाप्रमाणेच
भूमिका → ———"———
1964 मध्ये राज्य सतर्कता आयोगाची स्थापना - त्यांच्या सल्ल्याला अधिक महत्त्व.

संयुक्त राज्य लोकसेवा आयोग

राज्यघटनेत दोन किंवा अधिक राज्यांसाठी संयुक्त लोकसेवा आयोगाच्या स्थापनेची तरतुद - संबंधित राज्यांच्या विनंतीनुसार संसदेच्या कायद्याने स्थापना
म्हणून घटनात्मक संस्था नसून वैधानिक संस्था आहे.
1966 - मध्ये पंजाब व हरियाणा राज्यांसाठी संयुक्त रा. लो. आयोग.
→ राष्ट्रपती संयुक्त रा. लो. आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य नियुक्ती -
→ कार्यकाळ 6 वर्षे / 62 वर्षे.
→ राष्ट्रपती निलंबित करु शकतात. / पदावरुन काढू शकतात. / राजीनामा राष्ट्रपतीकडे.
→ सदस्य संख्या व सेवाशर्ती - राष्ट्रपती
→ अहवाल आयोग राज्यपालाला सादर करतो - राज्य विधिमंडळासमोर मांडतो.

# वित्त आयोग

→ घटनेच्या कलम २८० नुसार - (अर्धन्यायिक संस्था) - १९५१ साली - डॉ. आंबेडकर यांनी
→ राष्ट्रपती दर पाच वर्षांनी किंवा त्याला वाटेल तेव्हा वित्त आयोगाची स्थापना करतो.

**संरचना**
→ राष्ट्रपतीने नियुक्त केलेला अध्यक्ष व इतर चार सदस्य.
→ कार्यकाल राष्ट्रपतीने काढलेल्या आदेशानुसार - पुनर्नियुक्तीसाठी पात्र.
→ सदस्यांची अर्हता आणि निवडीची प्रक्रिया ठरविण्याचे अधिकार घटनेने संसदेला दिले आहेत.
त्यानुसार वित्त आयोग कायदा १९५१ नुसार पुढील प्रमाणे अर्हता निश्चित केली आहे.

**कार्ये**
→ १) निव्वळ कर संकलनाची केंद्र व राज्यात विभागणी
व त्याची राज्याराज्यांत वाटणी.
२) केंद्राने द्यावयाच्या (राज्यांना) अनुदानाबाबतची तत्त्वे. (भारताच्या संचित निधीतून)
३) राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत आणि नगरपालिका यांच्यासाठी
राज्याचा संचित निधी वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना.
४) वित्त प्रणाली संदर्भात राष्ट्रपतीने सांगितलेले इतर कोणतेही मुद्दे.

आयोग आपला अहवाल राष्ट्रपतीस सादर करतो - - राष्ट्रपती हा अहवाल व शिफारशीबाबत
घेतलेल्या कृतींचे स्पष्टीकरण - संसदेच्या दोन्ही सभागृहापुढे मांडतो.

**सल्लागारी भूमिका**
आयोगाच्या शिफारशी सल्ला स्वरूपाच्या : सरकारवर बंधनकारक नसतात.

**वित्त आयोग** - आतापर्यंत १५ वित्त आयोग नेमले गेले आहेत.

① पहिला वित्त आयोग → नियुक्ती १९५१ - अहवाल अंमलबजावणी - १९५२-५७.
अध्यक्ष - के.सी. नियोगी.
② आठवा वित्त आयोग → १९८२ - (१९८४-८९) अध्यक्ष - वाय.बी. चव्हाण.
③ तेरावा वित्त आयोग → २००७ - (२०१०-१५) अध्यक्ष - विजय केळकर
④ चौदावा वित्त आयोग → २०१३ (२०१५-२०) अध्यक्ष - वाय.व्ही. रेड्डी
⑤ पंधरावा वित्त आयोग → २०१७ (२०२०-२५) अध्यक्ष - एन.के. सिंग
पूर्णवेळ सदस्य - (सदस्य → अजय झा, अशोक लाहिरी, अनुप सिंग)
अर्धवेळ सदस्य - रमेश चंद - (शक्तीकांत दास → २०१७ ते २०१८)
सचिव - अरविंद मेहता.

Scanned by CamScanner

# * अनुसूचित जातीसाठी राष्ट्रीय आयोग *

स्थापना: कलम ३३८ नुसार ⇒ घटनात्मक संस्था.

① राष्ट्रीय माहिती आयोग - १९९२
② राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग - १९९३
③ मागासवर्गीयांसाठी राष्ट्रीय आयोग - १९९३
④ राष्ट्रीय मानवी हक्क आयोग - १९९३
⑤ राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग - २००७

} संसदेच्या कायद्याने स्थापन झालेले. म्हणून घटनात्मक नसून वैधानिक संस्था.

## आयोगाचा विकास :

① सुरुवातीला SC/ST यांच्या घटनात्मक सुरक्षेबाबतच्या मुद्यांची चौकशी करण्यासाठी विशेष अधिकारी नेमण्याची तरतुद ⇒ SC/ST साठी आयुक्त म्हणले जाई.

② सन १९७८ ⇒ SC/ST साठी अवैधानिक बहुसदस्यीय आयोगाची स्थापना (ठरावाद्वारे)

③ सन १९८७ ⇒ या आयोगाचे SC/ST साठी राष्ट्रीय आयोग असे नामकरण (ठरावाद्वारे)

④ सन १९९० ⇒ ६५ वी घ. दु. - उच्च स्तरीय व बहुसदस्यीय राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याची तरतुद (आयुक्त व १९७८ च्या आयोग यांच्या जागी) - घटनात्मक

⑤ सन २००३ ⇒ ८९ वी घ.दु. SC/ST या आयोगाचे विभाजन करून
SC साठी राष्ट्रीय आयोग → कलम ३३८
ST साठी राष्ट्रीय आयोग → कलम ३३८ ए
} दोन स्वतंत्र संस्था.

## अनुसूचित जातीसाठी स्वतंत्र आयोग :

सन २००४ मध्ये अस्तित्वात :- अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर ३ सदस्य.
नियुक्ती - राष्ट्रपतीकडून - सेवाशर्ती व कार्यकाळ राष्ट्रपती ठरवतो.

## कार्ये :

1) SC साठी असलेल्या घटनात्मक व कायदेशीर सुरक्षा उपाय योजना संबंधी - चौकशी, देखरेख व कामकाजाचे मुल्यमापन.
2) SC साठीच्या अधिकार पासून वंचित ठेवण्या विषयीच्या तक्रारींची चौकशी.
3) SC च्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना प्रक्रियेत सहभागी होणे व सल्ला देणे.
4) सुरक्षा उपाययोजनेच्या कामकाजाचा राष्ट्रपतीला वार्षिक अहवाल सादर करणे

## अहवाल

- अहवाल राष्ट्रपतीला ⇒ वार्षिक किंवा आयोगाला वाटेल त्या वेळी.
राष्ट्रपती - केलेल्या कृतीसह ⇒ संसदेसमोर.
न स्विकारलेल्या शिफारशींची कारणे
- आयोगाचा राज्य सरकार संबंधीचा अहवाल राष्ट्रपती राज्यपालाकडे पाठवतो.
राज्यपाल तो राज्यविधी मंडळासमोर मांडतो.

Scanned by CamScanner

## आयोगाचे अधिकार :

① आपल्या प्रक्रियांचे नियमन.

② कोणत्याही बाबींचा तपास किंवा तक्रारीची चौकशी करताना आयोगाला खटला चालविताना दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार: खालील बाबी.

i) देशाच्या कोणत्याही भागातून कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहण्याचे आदेश काढणे.

ii) त्याची शपथेवर तपासणी करणे.

iii) प्रतिज्ञापत्रावर साक्ष घेणे.

iv) न्यायालयातून (कोणत्याही) किंवा कार्यालयातून सार्वजनिक नोंदींची कागदपत्रे मागवणे.

## घटक: अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग.

कलम: 338-ए: घटनात्मक संस्था.

* सन 1990 - 65वी घदु: SC व ST साठी राष्ट्रीय आयोग अस्तित्वात - कलम 338 नुसार
* ST च्या कल्याणासाठी व विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यासाठी 1999 मध्ये आदिवासी कामकाज मंत्रालय हे नवीन मंत्रालय सुरू.
* सन 2003 - 89वी घदु: SC व ST आयोगाचे विभाजन.
* ST साठी राष्ट्रीय आयोग ही स्वतंत्र संस्था = 2004 मध्ये अस्तित्वात.

अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर 3 सदस्य - नियुक्ती राष्ट्रपतींकडून.

सेवाकाल व सेवाशर्ती - राष्ट्रपती ठरवतो.

आयोगाची कार्ये: SC साठीच्या आयोगाप्रमाणे.

आयोगाची इतर कार्ये: ① वन क्षेत्रात राहणाऱ्या ST ना दुय्यम उत्पादनाचे मालकी अधिकार देण्यासंबंधी उपाययोजना.

② जल व खनीज साधनांवरील अधिकारासंबंधी उपाययोजना

③ विकास प्रकल्पामुळे विस्थापित ST ना साहाय्य व पुनर्वसन.

④ त्यांच्याकडून जमीन हिरावून घेण्याविरुद्ध उपाययोजना.

⑤ पंचायत कायदा 1996 - ची अंमलबजावणी.

⑥ स्थलांतरीत किंवा फिरत्या शेतीची पद्धत बंद करण्यास उपाययोजना.

आयोगाचा अहवाल - SC आयोगाप्रमाणे.

आयोगाचे अधिकार —〃—

## १८क भाषिक अल्पसंख्याकांसाठी विशेष अधिकारी :

⇒ सुरुवातीला घटनेत तरतूद नव्हती.
⇒ राज्य पुनर्रचना समिती (१९५३-५५) - शिफारस
⇒ १९५६ → ७वी घटनादुरुस्ती - घटनेच्या भाग १७ मध्ये ३५० - बी या नव्या कलमाचा समावेश

त्यानुसार → ① भाषिक अल्पसंख्याकांसाठी विशेष अधिकारी असेल त्याची नेमणूक राष्ट्रपती.
② घटनेनुसार भाषिक अल्पसंख्याकांसाठी केलेल्या सुरक्षा उपाययोजनांसंबंधी सर्व बाबींविषयी तपास करणे हे अधिकाऱ्याचे काम.
तो सर्व अहवाल राष्ट्रपतीला सादर करील. राष्ट्रपती संसदेच्या कोणत्याही सभागृहापुढे मांडतील आणि संबंधित राज्यांच्या सरकारकडे पाठवतील.

विशेष अधिकाऱ्याच्या पदाची अर्हता, कार्यकाळ, वेतन, भत्ते, सेवाशर्ती, पदच्युती या बाबत घटनेत उल्लेख नाही.

### भाषिक अल्पसंख्याकांसाठी आयुक्त

घटनेच्या कलम ३५० बी मधील तरतुदीनुसार विशेष अधिकाऱ्याचे पद निर्माण करण्यात आले त्यास 'भाषिक अल्पसंख्याकांसाठीचा आयुक्त' म्हटले गेले.

आयुक्ताचे मुख्यालय ⇒ अलाहाबाद (उ. प्रदेश)
क्षेत्रीय कार्यालये ⇒ बेळगांव, चेन्नई, कोलकाता. - प्रमुख सहायक आयुक्त.

⇒ केंद्रस्तरावर आयुक्त हा अल्पसंख्याक कामकाज मंत्रालयाचा भाग आहे. अहवाल या मंत्रालयाद्वारे राष्ट्रपतीला सादर करतो.

**ध्येय** - भाषिक अल्पसंख्याकांच्या घटनात्मक सुरक्षा उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी त्याची यंत्रणा व प्रणाली सबळ व सुदृढ करणे आणि त्याद्वारे त्यांच्या अधिकारांचे रक्षण सुनिश्चित करून त्यांना समावेशक व एकात्मिक विकासाची संधी देणे.

**कार्ये व उद्दिष्टे**

कार्ये : 1) सुरक्षा उपायाबाबतच्या सर्व मुद्द्यांची चौकशी करणे.
2) उपाययोजनांच्या अंमलबजावणीच्या स्थितीविषयी राष्ट्रपतीला अहवाल सादर करणे.
3) प्रश्नावली, भेट, परिषदा, अभ्यासवर्ग, सभा, आढावा, यंत्रणा याद्वारे उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख.

उद्दिष्ट्ये - 1) भाषिक अल्पसंख्याकांना समावेश विकासाची व राष्ट्रीय एकात्मतेची समान संधी देणे.
2) त्यांना उपलब्ध असलेल्या सुरक्षा उपायांची परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करणे. 3) सुरक्षा उपायाबाबत तक्रार निवारणासंबंधी आलेली निवेदने हाताळणे.

Scanned by CamScanner